CMYK

बीड । मंगळवार

२७.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ५६

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१






# भीषण अपघात

## माजी आमदार आर टी देशमुख यांचा मृत्यू



### हायवेवर पावसाने साचलेलं पाणी, फॉर्च्युनर गाडी 4-5 वेळा उलटली; कारचा चुराडा

## भावपूर्ण श्रद्धांजली....




▶ माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आर टी जिजा देशमुख यांच्या निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास आपण मुकलो आहोत. त्यांच्या अकाली अपघाती निधनाने बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. भावपूर्ण श्रद्धांजली -माजी मंत्री आ. धनंजय मुंडे



▶ आर. टी. जिजा आणि आमच्या कुटुंबाचा अनेक दशकांपासूनचा कौटुंबिक स्नेह आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचे सच्चे सहकारी आणि त्यांच्या पश्चात आम च्यासोबत भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते असा त्यांचा राजकीय प्रवास आमच्यासोबत राहिला आहे. आज जिजांचे अपघाती निधन झाल्याची बातमी ऐकली आणि मन सुन्न झाले. अनेक वर्षांचा त्यांचा राजकीय सहवास नजरेसमोर आला. आर. टी. जिजा यांच निधन आम्हा सर्वांसाठी धक्कादायक आणि अत्यंत दुःखद आहे. दुःखाच्या या कठीण प्रसंगात आम्ही देशमुख कुटुंबाच्या सोबत आहोत. -माजी खा. प्रीतमताई मुंडे



▶ बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते भाजपचे माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख उर्फ जिजा यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आणि धक्कादायक आहे. त्यांच्या जाण्याने एक सर्वसामान्य लोकांना आधार देणारे, सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांची जाण असणारे प्रभावी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. भाजपा जिल्हाध्यक्ष आणि आमदार म्हणून त्यांनी केलेलं काम सदैव स्मरणात राहिल. ईश्वर जिजा यांच्या आत्म्यास सद्गती देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. - आ. सुरेश धस




▶ लातूर जिल्ह्यात घडलेल्या भीषण अपघातात माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आदरणीय आर. टी. देशमुख (जीजा) यांचे दुःखद निधन झाले. जीजांच्या जाण्याने बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली. - खासदार बजरंग सोनवणे



▶ प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर दुर्धर आजाराला जिजांनी हरवलेलं आपण सर्वांनी पाहिले. परंतु अपघाताने त्यांच त्यांचं निधन होईल याची कल्पना करवत नाही, ही बातमी वेदनादायी आहे.एकमेकांचे राजकीय विरोधक असताना राजकारणापलीकडे आम्ही मैत्रीपूर्ण संबंध कायम जपण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जाण्याने निश्चित मोठी पोकळी निर्माण झाली, जी भरून निघणार नाही. भावपूर्ण श्रद्धांजली !-आ. प्रकाश सोळंके




▶ माजी आमदार आर. टी. देशमुख साहेब यांच्या अपघाती निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. गोरगरीबांचे आमदार म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ख्याती मिळवलेल्या देशमुख साहेबांचे सामाजिक व राजकीय योगदान अजरामर राहील. त्यांच्या दिवंगत आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली - आ. नमिता मुंदडा



▶ माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आर. टी. देशमुख (जिजा) यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. अतिशय शांत, मृदू स्वभावाच्या या नेत्याने राजकारणापलीकडे वैयक्तिक संबंध जोपासले. आर. टी. देशमुख यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी होणार आहे. - आ. विजयसिंह पंडित



▶ ज्येष्ठ नेते आर. टी. देशमुख (जिजा) यांचे अपघाती निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आणि धक्कादायक आहे. सामाजिक एकोपा आणि बीडच्या विकासासाठीचे त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. माझ्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांप्रती असलेला त्यांचा प्रेमळ व्यवहार हा कायम आठवणीत राहील! अत्यंत जड अंतकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली ! भावपूर्ण श्रद्धांजली - रविकांत तुपकर, शेतकरी नेते



▶ लातूर जिल्ह्यात घडलेल्या भीषण अपघातात माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आदरणीय आर. टी. देशमुख (जिजा) यांचे दुःखद निधन झाले. ते जिजा या नावाने परिचित होते. स्व गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना. -लक्ष्मण हाके, ओबीसी नेते



▶माजलगाव मतदार संघाचे माजी आमदार आदरणीय आर.टी देशमुख जीजा यांचे औसा - लातुर रोडवर भिषण अपघातात निधन झाल्याचे बातमी अतिशय वेदनादायक आहे. आदरणीय आर टी देशमुख जिजा यांचे व माझे अतिशय स्नेहपुर्वक कौटुंबिक संबंध होते. ईश्वर जीजा यांच्या आत्म्यास शांती देवो..आणि या दुःखातुन देशमुख परीवारास सावरण्याच बळ देवो हिच ईश्वर चरणी प्रार्थना. - भाजपा नेते नवनाथ शिराळे तथा माजी न. प . सभापती बीड

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात रोज रस्ते अपघातांमध्ये अनेकांचे प्राण गेल्याच्या बातम्या आपण ऐकत असतो. गेल्या काही दिवसांत सातत्याने अपघाताचे वृत्त माध्यमांत झळकत आहे. आता, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील बेलकुंड उड्डाणपूल वरून जात असताना गाडी स्लिप होऊन सुरक्षा कठडा तोडून चारवेळेस पलटी झाल्याने भीषण अपघाताची घटना घडली. तुळजापूर -औसा महामार्गावर कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे, या अपघातात भाजपचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू झाला आहे, आर. टी. देशमुख हे माजलगावचे माजी आमदार होते.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या गाडीचा तुळजापूर-औसा महामार्गावर भीषण असा अपघात झाला. औसा तालुक्यातील बेलकुंडजवळ त्यांच्या गाडीचा अपघात घडल्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी लातूर येथे पाठवण्यात आले होते. लातूर येथील सह्याद्री रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु असतानाच त्यांचा मृत्यू झाला. यावेळी त्यांच्यासोबत चालक आणि अंगरक्षकही होते. ते दोघे ही जखमी झाले आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या सोशल मि





डीया अकाऊंटवर या अपघाताची पोस्ट टाकत श्रध्दांजली अर्पण केली. आर.टी. देशमुख हे फॉर्च्युनर गाडीने तुळजापूर औसा, लातूर मार्गे बीडला जात होते. मुसळधार पावसामुळे राष्ट्रीय महामार्ग ३६१वर पाणी साचले होते. बेलकुंड ▶▶ उर्वरित पान २ वर

### ●आर.टी. देशमुखांच्या निधनाने बीड जिल्ह्यात शोकाकुल वातावरण

**आरटी देशमुख हे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदारसंघातून भाजपच्या तिकीटावर आमदार बनले होते. ते दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक म्हणून बीड जिल्ह्यात परिचित होते. त्यांच्या निधनाचे वृत्त येताच बीड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.**

### ●मंत्री पंकजा मुंडेंचे सर्व कार्यक्रम रद्द



**दरम्यान राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत नांदेड येथील कार्यक्रमात असतानाच त्यांना ही माहिती कळाली. त्यानंतर तातडीने त्यांनी आपले सर्व कार्यक्रम रद्द करत नांदेडहून लातूरकडे प्रस्थान केले. आर टी देशमुख यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांनी धीर दिला. तसेच सह्याद्री हॉस्पिटलच्या डॉ. किनीकर यांच्याशीही संवाद साधून माहिती घेतली.**

### ●आर टी देशमुखांच्या गाडीचा अपघात कसा झाला?



**उड्डाणपुलावरील उतारावर गाडी निघाली असता पावसाचे पाणी उतारावर वाहत होते. हे पाणी गाडीच्या समोरील काचेवर आल्याने वाहन चालकाला अंदाज आला नाही. ब्रेक लावण्याच्या घाईत आर.टी. देशमुखांची गाडी फ्लायओव्हरवरील पाच लोखंडी कठडे तोडत सर्व्हिस रोडच्या बाजूला येऊन पडली. त्यांची कार अत्यंत वेगात असल्याने कारने चार पलट्या खाल्ल्या होत्या. गाडी अक्षरशः चक्काचूर झाली होती. बाजूलाच बेलकुंड पोलिसांचा आऊट पोस्ट आहे. त्यांनी तात्काळ रुग्णवाहिकेला संपर्क केला. गाडीतील जखमींना तातडीने बाहेर काढण्यात आले. मात्र, उपचारासाठी लातूरकडे घेऊन निघाला असतानाच वाटेतच माजी आमदार आर टी देशमुख यांचा मृत्यू झाला.**

## आष्टी: जीप झाडाला धडकून तीन ठार

**आष्टी । प्रतिनिधी**

मुकादमासह दोघेजण जीपमधून गावाकडे जात असताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने जीप झाडावर आदळली.यात दोघांचा जागीच, तर अन्य एकाचा दुसऱ्या दिवशी उपचार सुरू असताना मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील



माढा तालुक्यातील अकोले बुद्रुक येथील तानाजी संभाजी माने हे ऊसतोड मुकादम म्हणून काम करत होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील काही मजूर त्यांच्याकडे काम करतात. २१ रोजी एका मजुराच्या घरात लग्न असल्याने मुकादमासह संतोष नवले, बापू जाधव हे तिघेजण जीप क्र. एमएच ४५ एझेड ५०७७ पाथर्डीला आले. लग्न लावले, नवीन ▶▶ उर्वरित पान २ वर

## मांजरसुंब्यात ट्रकने दुचाकीला दिली धडक; एक ठार

**बीड । प्रतिनिधी**

भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण ठार झाल्याची दुर्दैवी घटना आज सोमवारी सकाळ च्या सुमारास मांजरसुंबा उड्डाणपुला जवळील सर्व्हिस रोडवर घडली. सविस्तर माहिती अशी कि, बीड तालुक्यातील येळंबघाट येथील बाबूशा रामभाऊ कदम वय ५३ वर्ष ह.मु.कृषि कॉलनी, बीड हे आज सकाळी ९ च्या सुमारास माजरसुबा मार्गे येळंबघाटकडे दुचाकी ▶▶ उर्वरित पान २ वर



# अपघातातून बचावले पण भरधाव ट्रकने चिरडले,

## बीडमध्ये ६ जणांचा मृत्यू, गाडी चक्काचूर



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या गढी परिसरात सोमवारी रात्री उशिरा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला आहे. आणि गाडी अक्षकसः चक्काचूर झाली आहे. घडलेल्या भीषण अपघातात गेवराई येथील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला.ही घटना बीड येथील गढी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकाजवळ घडली.

गेवराई शहरातील काही नागरिकांची चारचाकी गाडी गढी परिसरात तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली होती. त्यामुळे हे सहा जण गाडी आणण्यासाठी त्या ठिकाणी गेले होते. तेव्हा भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने थेट त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली.

या धडकेत सर्व सहाजणांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले असून, अपघातग्रस्त कंटेनर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई ▶▶ उर्वरित पान २ वर

### ●अशी आहेत मृत व्यक्तींची नावे

**बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा मृत्यू झाला असून एका जण गंभीर जखमी झालाय. तसचे जखमी व्यक्तीवर सध्या उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थाळ गाठत पुढील कारवाई सुरू केली आहे. या घटनेत कारचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तर ट्रक चालक ट्रकसह घटनास्थळावरुन फरार झाला आहे. त्यामुळे पोलीस या ट्रक चालकाचाही शोध घेत आहे. मात्र सहा जणांच्या अपघाती निधनाने गेवराईवर शोककळा पसरली आहे.**




CMYK

विशेष संपादकीय...

# ‘दादा’ नाही तर ‘राजा’ कोण?



मिशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या माजाला कडक प्रतिउत्तर दिलं आणि या शौर्यगाथेला शिवसेनेने केलेलं साजेसं मानाचं वंदन बीडच्या मातीत देशभक्तीचं एक अभूतपूर्व दृश्य ठरलं. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली निघालेली तिरंगा रॅली ही देशप्रेमाने माखलेली तर होतीच पण याबरोबर शिवसैनिकांच्या मनात अनिलदादांसाठी असलेल्या निष्ठेचा झंझावात होता. भारतमातेच्या वीरांना वंदन करण्यासाठी अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक हाक दिली आणि पाहता पाहता बीड जिल्ह्यातून हजारो तरुण हातात तिरंगा, मनात देशप्रेम आणि डोळ्यांत स्वतःच्या दादा बद्दलचा अढळ विश्वास घेऊन तुफान वाऱ्यासारखे मोटारसायकलवर बीड शहरात जमा झाले. अनिलदादांचं निमंत्रण स्विकारून मंत्री ना. संजय शिरसाट यांनी लावलेली हजेरी म्हणजे या रॅलीच्या तेजात भर टाकणारा सूर्यकिरण ठरली. विधानसभा निवडणुकीच्या अपयशानंतर खचून न जाता अनिलदादांनी खेळाडूवृत्तीने, पुन्हा नव्या जोमाने जनतेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त १३ हजार बालकलाकारांचा ऐतिहासिक सहभाग असलेल्या चंपावती महोत्सवाचे यशस्वी आयोजन, असंख्य तरुणांचे वारंवार शिवसेनेत होणारे प्रवेश, शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या सातत्याने होणाऱ्या बैठक, नियुक्त्या, समस्या अडचणी घेऊन सर्व सामान्यांची शिवसेना कार्यालयात सततची असणारी गर्दी आणि शिवसेना वरिष्ठ नेत्यांसोबतच्या सतत सुरु असलेल्या अनिलदादांच्या गाठीभेटीतून दिसून येत असलेली घनिष्ठता हे सर्व काही सिद्ध करतं की, अनिल जगताप हे फक्त जिल्हाप्रमुख नाहीत तर ते बीड जिल्हा शिवसेनेचे आणि जनतेचे मुकुट आहेत. अनिलदादांनी कधीही जात, धर्म, पक्ष असा भेद केला नाही. त्यांनी माणसाला माणूस म्हणून जवळ केलं, यामुळेच माणुसकीच्या राजकारणाचा हा झंझावात आजही जनतेच्या हृदयात तितकाच जिवंत असल्याचं दिसून येत आहे. जिथे पद नसतानाही लाखोंचे पाठबळ असतं, जिथे पराभव असतानाही लोकप्रियतेचा झेंडा उंच असतो आणि जिथे एक हाक लाखांमध्ये उत्साह निर्माण करते तिथे ‘दादा’ नाही तर ‘राजा’ कोण असा प्रश्न उमटतो? शेर अपनी ताकत से राजा कहलाता है... आणि अनिल दादा आपल्या निष्ठेने, माणुसकीने आणि कार्याने जनतेच्या हृदयात अढळ स्थान मिळवतात. आज बीडकरांना पुन्हा एकदा एक गोष्ट ठामपणे समजली की, अनिलदादांचा पराभव झाला असेल, पण त्यांचा प्रभाव अजूनही जनतेच्या काळजावर आणि शिवसैनिकांवर बिंबलेला आहे. कालची तिरंगा रॅली म्हणजे त्यांच्या लोकप्रियतेची, नेतृत्वशक्तीची आणि सामाजिक बांधिलकीची एक भव्य प्रतीती होती. ती रॅली नव्हती, ती होती जनतेच्या आणि शिवसैनिकांच्या हृदयातून उसळलेली श्रद्धा, बाळासाहेबांच्या खमक्या जिल्हा प्रमुखासाठी दिलेला अभूतपूर्व सलाम. जनतेच्या मनात जागा निर्माण करणाऱ्या दादांसारख्या नेत्यासाठी, पुन्हा एकदा बीड सज्ज होत आहे. कारण, अनिलदादा म्हणजे जनतेचा नेता, जनतेचा मित्र, आणि माणुसकीच्या राजकारणाचा खरा चेहरा आहे.

# बीड जिल्ह्यासाठी अपघाती सत्र! मुंडे, मेटे आणि आता आर. टी देशमुख, संशयाचं मळभ मात्र कायम

सगळं काही रोजच्यासारखं सराईतपणे चालू असताना अशीच बातमी आली की बीडचे नेते गोपीनाथ मुंडे यांचा अपघात झालाय. त्यानंतर काहीच वेळात बातमी आली की गोपीनाथ मुंडे यांचं निधन. अनेक वर्ष संघर्षाची वाट धरलेले आणि मोठा प्रवास केलेले गोपीनाथ मुंडे अशा अपघाती निधनात गेले याची हळहळ ही अनेकांसाठी चटका लावणारी बातमी होती. त्यापेक्षा धक्कादायक गोष्ट होती ती नुकतीच त्यांनी केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतल्याने ते असे कसे गेले याची.

बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राला एक राजकीय उभारी देणारी बातमी ही त्यांच्या मंत्रिपदाची होती. मात्र, त्यानंतर थेट मृत्यूची बातमी आल्याने सगळ्यांचा अस्वस्थ करणारा धक्का बसला होता. त्यातही अपघात झाला त्याची फक्त बातमी आली. ना कुठला व्हिडिओ आला ना कुठला फोटो. त्यामुळं केंद्रीय मंत्र्याचा असा कसा अपघात झाला अशी शंका येऊन अनेकांनी याची अपघात की घातपात अशी चर्चा केली. आजही जेव्हा जेव्हा विषय येतो तेव्हा त्यांचा खरच अपघाती मृत्यू झाला की काही घात झाला अशी शंका येते आणि घातच झाला असेल असच जास्त गडदपणे वाटत असं अनेक लोक बोलतात. मात्र, तशी कुठलीच शंका घेऊन त्यांच्या कुटुंबातील किंवा इतरांनी काही ठोस मागणी न केल्याने तो विषय मागचं पडला



पुन्हा तेच घडलं. मध्यरात्रीच मुंबई महामार्गावर अपघात झाला आणि त्यामध्ये बीडचे नेते विनायक मेटे गेल्याची बातमी आली. या माणसानेही संघर्षाची मोठी वाट पार केली होती. त्यांना जिल्ह्यासाठी किंवा राज्यासाठी काही विधायक करता येईल अशी परिस्थिती निर्माण झालेली असतानाच ते अपघाती गेले. त्यांच्याबद्दलही मनात अनेकदा शंकाच आली. खरच गेले की काही घातपातच झाला? कारण त्यावेळीही शंका घ्यायला अनेक वाव होता. मेटे यांचा अपघात झाला तेव्हा त्या ठिकाणाचा पत्ता चालक लवकर देत नव्हता. त्याने किमान आडीच ते तीन तास पत्ता सांगायला उशिर केला. हा उशिर का केला? त्यातही अपघातात चालक एकदम सुखरूप.

मेटे यांनाही डोक्याच्या मगच्या बाजूला कापल्यासारखंच लागलं अन् हाताला थोड. बाकी कुठं काही नाही मग शंका का येणार नाही? त्याचवेळी अनेक राजकीय लोक तेथे आले अन् त्यांनी मीडियावर लगेच हा दुर्दैवी अपघात आहे, ते मोठे नेते होते असं बोलून सगळेच मोकळे व्हायला लागले. मात्र, मेटे यांच्या सामान्य कार्यकर्त्याला शंका आली तो तशा पद्धतीने बोलू लागला. त्यामुळे हे सगळ घडल्यानंतर त्याची पुढे सखोल चौकशी होईल असं वाटलं असताना तस काही घडलं नाही. त्यांच्या पत्नी नोकरी सोडून राजकारणात आल्या. मग चौकशीची कुणी मागणी करायची हाच प्रश्न निर्माण झाला. कारण, कुटुंबातल्या माणसाने विषय लावून धरला तर लोक सोबत उभा राहिले असते. पण, त्यांनीच पुढचा रास्ता धरल्यावर लोक कुठल्या रस्त्याने जाणार? त्यामुळे त्यांचाही विषय असाच मागे पडला


काल अशीच दुःखद आणि दुर्दैवी बातमी समोर आली. बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते, भाजपचे माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख उर्फ जिजा यांचे लातूरला जात असताना अपघाती निधन झाले. आर. टी. यांच्या निधनाची बातमी मोठी दुःखदायक आहे. मात्र, हा अपघातच आहे. याचे फोटो व्हिडीओ समोर आलेत आणि गाडी स्लिप झाल्याचं स्पष्ट दिसतंय. मात्र, जिजा नावाने ओळखले जाणारे आर. टी. संयम ठेऊन आणि धोरणीपणाने पुढे जाणारे नेते होते.

गोपीनाथ मुंडे यांच्याशी त्यांनी ज्या वकुबाने काम केलं त्याच वकुबाने ते आजही राजकारणात वावरत होते. गोपीनथ मुंडे यांचा हुकमी एक्का म्हणता येईल अशा फळीतले आर.टी देशमुख होते. मधल्या काळात तब्येतीच्या काही तक्रारी आल्याने ते थोडे राजकीय पटलावरून बाहेर असल्यासारखं झालं होत. मात्र, आता ते पुन्हा सक्रिय पातळीवर आले होते. परंतु, नियतीने घाला घातलाच आणि त्यांना कवेत घेतलं. माजलगाव आणि बीड जिल्ह्यासाठी मोठी तळमळ असलेला नेता अपघाती निधनाने गेला हे दुःखदायक आणि वेदनादायी आहे. मात्र, बीड जिल्ह्यातील हे मातब्बर नेते अपघाताने गेल्याने जिल्ह्याचं जे नुकसान झालं ते अधिक दुःखदायक आहे. त्यातही मुंडे आणि मेटे यांच्या अपघाती निधनाचं आजही गूढ कायम आहे

# खळबळ! छत्रपती संभाजीनगरमध्ये संशयित दरोडेखोराचा एन्काउंटर; पोलिसांनी मध्यरात्री सापळा रचला अन्....

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

व्यावसायिक संतोष लड्डा यांच्या घरावर पडलेल्या दरोड्यातील संशयित आरोपीचा एन्काउंटर करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. अमोल खोतकर असं संशयित आरोपीचे नाव आहे. वडगाव कोल्हाटीमध्ये अमोलने पोलिसांच्या अंगावर गाडी चढवली तेव्हा प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी अमोलवर फायरिंग केले त्यातच त्याचा एन्काउंटर झाला. दरम्यान लड्डा यांच्या घरावर पडलेल्या दरोड्याचा सर्व मुद्देमाल संशयित अमोलकडेच असल्याची माहिती आहे. सोमवारी रात्री साडेबारा ते एकच्या दरम्यान ही घटना घडली आहे. १० दिवसांपूर्वी वाळूजमध्ये व्यावसायिक संतोष लड्डा यांच्या घरावर दरोडा पडला होता. त्यावेळी ५ किलो सोनं



आणि चांदी चोरीला गेली होती. हा शहरातील आत्तापर्यंतचा सर्वात मोठा दरोडा असल्याचे म्हटले जाते. त्याचा तपास पोलिस करत होते. त्यावेळी संशयित अमोल खोतकर याचा शोध घेताना ही चकमक घडली आणि आरोपीचा मृत्यू झाला.

कसा झाला एन्काउंटर- साजापूर वडगाव कोल्हाटी मार्गावर असलेल्या हॉटेल साई गार्डन या हॉटेलचा मालक या दरोडा प्रकरणात संशयित आरोपी आहे. अमोल खोतकर त्याला भेटायला हॉटेलवर येणार असल्याची माहिती त्यानेच पोलिसांना दिली त्यानुसार पोलिसांनी हॉटेलच्या परिसरात साध्या वेशात सापळा रचला होता. अमोल खोतकर मध्यरात्रीनंतर त्याच्या मैत्रिणीसह एका गाडीत हॉटेल जवळ आला आणि हॉटेलच्या मालकाला अमोलने खाली बोलावलं मात्र हॉटेलचा मालक खाली आला नाही तर समोरून पोलीस आले. त्यांनी अमोल खोतकर ला थांबण्याचा इशारा दिला मात्र लागलीच अमोलने थेट गोळीबार सुरू केला. तसंच पोलिसांच्या अंगावर गाडी घातली. यात एक पोलीस कॉन्स्टेबल जखमी सुद्धा झाला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी गोळीबार केला. त्यात अमोलच्या छातीजवळ गोळी लागली गाडी रस्त्यावरून खाली उतरली आणि घटनास्थळीच अमोलचा मृत्यू झाला.

## सावंतवाडी उमरी येथील महालक्ष्मी लोकनाटय कला केंद्राचा परवाना रद्द

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक बीड यांनी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केजबाबत जिल्हाधिकारी कार्यालयासअहवाल सादर केला असून सदरील अहवालामध्ये त्यांनी महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केज या ठिकाणी बाहेरील जिल्ह्यातून महिला आणून आरोपी हे वेश्या व्यवसाय करून घेत असे तपासात निष्पन्न झालेले आहे. तसेच यापूर्वी सदरील लोकनाट्य कला केंद्र चालक यांच्यावर दिनांक ७.७. २०२३ रोजी पोलीस ठाणे केज येथे गुरनं १८८, १०९, ११४, २९०,३४,३७० (४) (५), ३७० (अ) ३७३, ३७६ (फ) (आय) भादवी सह कलम च४,६, १७, १८, २१ बालकांचे लैंगिक अत्याचार अधिनियम सह कलम ३,४,५,६,८,९२०१५ सह कलम ३ (२) (त) अजाज अप्रका सह कलम ६५ (ई) मु.आ.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरठिकाणी पुन्हा अशा स्वरुपाचा गुन्हा घडू नये पिडीत महिलांचे शोषण होऊ नये म्हणून त्यावर कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर गुन्याचे घटनास्थळ महालक्ष्मी कला केंद्र, सर्वे नंबर १६०, सावंतवाडी (उमरी) ता. केज यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होऊन सदरचे कला केंद्र सिल होण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील प्रकरणास सुनावणी घेऊन सुनावणी अंति सदरील महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केज यांना देण्यात आलेल्या लोकनाट्य कला केंद्राचा परवाना रद्द करण्याचे आदेश पारित केलेले आहे असे जिल्हाधिकारी बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# शेतीची मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांने केली हेलिकॉप्टरची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील खडकी देवळा येथील रहिवासी असलेले शेतकरी मल्हारी मुंडे, गोरख दराडे, दादाशिव चोले, यांनी न्यायालयाकडे २०१५ पासून वारंवार मागणी करूनही घडवलेला रस्ता खुला करण्यात आलेला नसल्याने संतप्त शेतकऱ्याने थेट वडवणी तहसीलदार कार्यालयात शेतीच्या मशागतीसाठी हेलिकॉप्टरची मागणी निवेदनाद्वारे केलेली आहे.खडकी व देवळा या गावाच्या मुख्य रस्त्यापासून उत्तरेला असलेला शिव रस्ता काही शेतकऱ्यांनी जाणूनबुजून बेकायदेशीर अडवला असून तो खुला करावा असे निवेदन अनेक वेळा करून उपोषणे ही केलेली असतांना प्रशासनाने



फक्त मंडळ अधिकारी व तलाठी यांना पाठवून प्रत्येक वेळा गोळ बोलुन रस्ता खुला करून देतो म्हणून अनेक वेळा पंचनामे करून पुढे कसलीच कार्यवाही केलेली नाही त्यामुळे आम्हाला २०१५ पासून शेतीच्या मशागत करणे कठीण होत आहे. रस्ता बंद असल्याने जमीन पडीक पडण्याची वेळ आलेली आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असून अद्यापपर्यंत हा रस्ता खुला करण्यांत आलेला नाही त्यामुळे आम्हाला शेतीची मशागत करायची असून आणि आपण अजूनपर्यंत रस्ता खुला केल्या नसल्याने आम्हाला शेतीच्या मशागतीसाठी आपल्या मार्फत निःशुल्क हेलिकॉप्टर उपलब्ध करून द्यावे नंतर आपल्याला वाटेल त्यावेळी हा रस्ता खुला करावा असे आशयाचे निवेदन वडवणी तहसील कार्यालयात देण्यात आले आहे.

पान १ वरून पुढे...

## भीषण अपघात...

येथील उड्डाणपुलावरुन उतरत असताना त्या पाण्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. यानंतर गाडीने पाच ते सहा वेळा पलटी खाल्ली. यावेळी आर.टी. देशमुख गाडीबाहेर फेकले गेले त्यानंतर गाडी आर. टी. देशमुख यांच्या अंगावर पडली. देशमुख हे गाडीखाली अडकले होते. घटनास्थळी पोलिस आल्यानंतर त्यांच्या अंगावरील गाडी हटवण्यात आली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. दरम्यान, त्यांना तात्काळ लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले, पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच मंत्री पंकजा मुंडेंनी तत्काळ आपले कार्यक्रम रद्द करुन लातूरला रवाना झाल्या आहेत. आर.टी. देशमुख यांचे निधन झाल्याने बीड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

२०१४ मध्ये माजलगाव मतदारसंघातून आर. टी. देशमुख यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढत बाजी मारली. त्यांनी तीन टर्मचे आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रकाशदादा सोळंके यांचा ३७ हजार २४५ मतांनी पराभव केला. आर. टी. देशमुख यांनी १ लाख १२ हजार ४९७ मतं घेतली. सोळंके यांना केवळ ७५ हजार २५२ मतं मिळाली. २०१९ मध्ये माजलगावातून भाजपने रमेशराव कोकाटे यांना उमेदवारी दिली. राष्ट्रवादीच्या सोळंके यांनी कोकाटे यांचा १२ हजार ८९० मतांनी पराभव केला.

पान १ वरून पुढे...

## आष्टी: जीप...

मजूर बघून इसार देऊन माने रात्री एक ते पावणेदोनच्या सुमारास घराच्या दिशेने निघाले.पाथर्डी-अहिल्यानगर महामार्गावरील आष्टी तालुक्यातील मराठवाडी शिवारातील रस्त्याच्या बाजूला असलेल्या चिंचेच्या झाडावर जीप आदळली. यात संतोष साहेबराव नवले, बापू राजेंद्र जाधव या दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर जीप चालक मकादम तानाजी संभाजी माने हे गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दुसऱ्या दिवशी उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. २४ मे रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात रामचंद्र साहेबराव नवले यांच्या फिर्यादीवरून भरधाव वाहन चालविताना निष्काळजीपणा करून दोघांच्या व स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याप्रकरणी मयत चालक संभाजी माने याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मांजरसुंब्यात ट्रकने...

क्रमांक एम.एच.१२. एच.ई. ७०९० ने जात असतांना मांजरसुंबा येथील उड्डाणपुला जवळील सर्व्हिस रोडवर पाठीमागून येणाऱ्या ट्रकने त्यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. या अपघातात बाबूशा कदम हे गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तात्काळ बीडच्या खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं

पान १ वरून पुढे...

## अपघातातून बचावले...

येथील रहिवाशाची एसयूव्ही कार राष्ट्रीय महामार्ग ५२ वर १०० किमी अंतरावर असलेल्या गढी गावाजवळ दुभाजकावरुन चढली. यावेळी सगळेजण गाडीवरुन खाली उतरले. आणि एसयूव्ही गाडीला बाजू करण्याचा प्रयत्न सुरु केला. या सगळ्यात व्यस्त असताना ११.३० च्या सुमारास एका ट्रकने त्यांना चिरडलं. हा अपघात इतका भीषण झाला की, सहा जणांचा मृत्यू झाला.

नाशिक मुंबई महामार्गावर ठाण्याजवळ दुहेरी अपघात

कांदा घेऊन येणार ट्रक उलटला तर सिमेंट मीक्षचर रस्त्याच्या कडेला खचल्याने मोठा अपघातझाला आहे. नाशिक हुन मुंबईला येणाऱ्या मार्गिकेवर माजीवडा पुलाच्या अलीकडे भर रस्त्यात ट्रक उलटला तर त्याच्याच बाजूला सिमेंट मिक्सर पावसाने झालेल्या चिखलात रुतला.दोन्ही अपघाताने मुंबईकडे येणाऱ्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून खारिगाव ते माजीवडा उड्डाण पुलापर्यंत मोठी वाहतुकीची कोंडी झालीय..वाहतूक पोलीस घटनास्थळी धाव घेतली असून ट्रक बाजूला करण्याचे काम सुरू आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com